# अधिसूचना

सार्वजनिक आरोग्य विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
~~दिनांक~~ [illegible]

भारताचे संविधान

क्र.आरटीआर १२९९/प्र.क्र.४८/सेवा-२ :- भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन, सद्या अस्तित्वात असलेले सर्व नियम, आदेश व अनुदेश निष्प्रभावी करुन महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य सेवा संचालनालयातील सामान्य राज्य सेवा मधील सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (शुश्रुषा) गट-अ या पदाच्या सेवा भरतीचे विनियमन करणारे पुढील नियम करीत आहेत. जसे ,-

१. या नियमांना आरोग्य सेवा संचालनालयातील "सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा(शुश्रुषा) गट-अ (सेवा प्रवेश) नियम,२००२" असे संबोधण्यात यावे.

२. या नियमांमध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर :-

(अ) "आयोग" म्हणजे महाराष्ट्र लोकसेवा आयोग,

(ब) "पदवी " म्हणजे सांविधीक विद्यापीठाची पदवी ,

(क) "संचालनालय" म्हणजे महाराष्ट्र शासनाचे आरोग्य सेवा संचालनालय.

(ड) "शासन" म्हणजे महाराष्ट्र शासन.

(फ) "भारतीय शुश्रुषा परिषद " म्हणजे भारतीय शुश्रुषा परिषद अधिनियम १९४७ नुसार निर्माण करण्यांत आलेली भारतीय वैद्यकीय परिषद.

३. संचालनालयातंर्गत सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (शुश्रुषा) गट-अ या पदावर करावयाची नेमणूक पुढील पैकी कोणत्याही एका प्रकारे करता येईल ,-

(अ) संचालनालयामधील मेट्रन गट-ब या पदावर काम करीत असलेल्या व त्या संवर्गात किमान ३ वर्षे नियमित सेवा केलेल्या आणि या नियमाच्या खंड (ब) मध्ये नामनिर्देशनाद्वारे करावयाच्या नेमणुकीसाठी विहीत केलेली शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या व्यक्तींमधून ज्येष्ठता अधीन [illegible] निकषाच्या आधारे पदोन्नती देऊन नेमणूक करता येईल, किंवा

(ब) ज्या उमेदवारांच्याबाबतीत पुढील शर्ती पुर्ण होत असतील अशा व्यक्तींमधून नामनिर्देशनाद्वारे करता येईल,-

(एक) अगोदरच शासन सेवेत असेल त्या खेरीज करुन ज्यांचे वय ४५ वर्षापेक्षा जास्त नसेल

आणि

(दोन) भारतीय शुश्रुषा परिषदेने मान्यता दिलेली शुश्रुषा विषयातील पदवी किंवा परिषदेने समतुल्य म्हणून मान्य केलेली अन्य कोणतीही अर्हता धारण करीत आहे, आणि

(तीन) महाराष्ट्र शुश्रुषा परिषदेमध्ये नोंदणीकृत किंवा नोंदणीस पात्र असणाऱ्या अर्हता धारक परिचारीका किंवा प्रसविका, आणि

(चार) वरील उपखंड (दोन) आणि (तीन) मध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता संपादन केल्यानंतर रुग्णालयीन व्यवस्थापनाच्या किंवा शुश्रुषा विषयामध्ये शिकविण्याचा किंवा या दोन्हीही कामाचा एकत्रित

करणाऱ्या उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल.

परंतु आणखी असे की, विहित केलेली कमाल वयोमर्यादे संबंधीची शर्त ही, असाधारण अर्हता किंवा अनुभव किंवा दोन्हीही धारण करणा-या उमेदवारांच्या बाबतीत शासन आयोगाच्या शिफारशीनुसार शिथिल करू शकेल.

४. या पदावर नामनिर्देशनाने नियुक्त झालेली व्यक्ती दोन वर्षाच्या कालावधीकरीता परिवीक्षाधीन राहील. या कालावधीत कोणत्याही प्रशिक्षणासाठी व्यतीत केलेला कालावधी परिवीक्षाधीन कालावधी म्हणून ग्राहय धरण्यात येईल. जर नियुक्ती दिलेली व्यक्ती दोन वर्षाचा परिवीक्षाधीन कालावधी समाधानकारकरीत्या पूर्ण करण्यास अयशस्वी ठरली तर सदर परिवीक्षाधीन कालावधी योग्य वाटेल इतक्या कालावधी पर्यंत वाढला जाईल तथापि हा कालावधी एक वर्षापेक्षा जास्त असणार नाही. परंतु वाढीव कालावधीमध्येही तिचे काम असमाधानकारक असल्याचे आढळून आल्यास नियुक्ती दिलेली व्यक्ती सेवा समाप्त करण्यास पात्र राहील.

५. या पदावर पदोन्नतीने किंवा नामनिर्देशनाने नेमणूक झालेल्या व्यक्तीस,-

(अ) वेळोवेळी विहित केलेले प्रशिक्षण घ्यावे लागेल किंवा विहित केलेली परीक्षा उत्तीर्ण व्हावी लागेल किंवा दोन्ही, आणि

(ब) या परीक्षा पूर्वीच उत्तीर्ण झाली नसेल अथवा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळालेली नसेल तर त्या बाबतीत विहित केलेल्या नियमानुसार मराठी व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असेल.

(क) संचालक, माहीती व तंत्रज्ञान, महाराष्ट्र शासन यांनी वेळोवेळी विहित केलेले संगणक हाताळणीचे प्रशिक्षण घेतलेले असावे.

६. या पदावर नियुक्त केलेल्या व्यक्तीस, आवश्यकता भासल्यास कोणत्याही भारतीय संरक्षण सेवेमध्ये किंवा भारताच्या संरक्षणाशी निगडीत असलेल्या पदावर भारतात कोठेही किंवा भारताबाहेर यासाठी आवश्यक असलेल्या प्रशिक्षणासाठी खर्च झालेला कालावधी धरून कमीत कमी चार वर्षे कालावधीसाठी भारत सरकारने वेळोवेळी निश्चित केलेल्या अटी व शर्तीनुसार सेवा करावी लागेल.

परंतु असे की, जिच्या नेमणूकीस १० वर्षे पूर्ण झाली आहेत अथवा सर्वसाधारणपणे जिच्या वयाची ४५ वर्षे पूर्ण झाली आहेत अशा व्यक्तीस वरीलप्रमाणे सेवा करावी लागणार नाही.

या पदावर नियुक्त झालेली व्यक्ती महाराष्ट्र राज्यामध्ये कोठेही बदलीस पात्र आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

शासनाचे अवर सचिव

प्रति,

राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.

सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राद्वारे पाच प्रतींसह)

महासंचालक, आरोग्य सेवा, मुंबई.

अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा (सर्व)

सहसंचालक आरोग्य सेवा (सर्व)

उपसंचालक, आरोग्य सेवा (सर्व).

महालेखापाल, महाराष्ट्र राज्य १/२,(लेखा अनुज्ञेयता) / (लेखा परीक्षा), मुंबई / नागपूर.

विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.

सामान्य प्रशासन विभाग (कार्यासन-१२), मंत्रालय, मुंबई.

निवडनस्ती (सेवा-२)

या अधिसूचनेच्या पाच प्रतींसह व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई यांचे कडे

क्र. आरटीआर १२९९/प्र.क्र. ८८/सेवा-२
सार्वजनिक आरोग्य विभाग
मंत्रालय मुंबई ४०००३२
दि. २२/११/२००२.

त्यांना विनंती करण्यात येते की, सदरची अधिसूचना ही राजपत्रात भाग - ४अ मध्ये प्रसिध्द करावी आणि त्याच्या २०० प्रती या विभागास पाठविण्यात याव्यात.

(सि.मं.इनामदार)
शासनाचे अवर सचिव